"अहमदनगर जिल्हयातील आदिवासी शाळांमधील उपलब्ध क्रीडा सोयी-सुविधांचा एक चिकीत्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

शारीरिक शिक्षण विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा प्रस्तावित आराखडा

संशोधक

प्रविण दौलतराव गुंजाळ

मार्गदर्शक

डॉ. कैलास पाळणे

शारीरिक शिक्षण विभाग,

शिवजागृतीवरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव

ता. चाकूर, जि. लातूर

सन २०२२

"अहमदनगर जिल्हयातील आदिवासी शाळांमधील उपलब्ध क्रीडा सोयी-सुविधांचा एक चिकीत्सक अभ्यास"

प्रस्तावना :

आदिवासी समाज हा अति प्राचीन मुळ भारतीय समाज आहे. डोंगराळ व दुर्गम भागात असणाऱ्या शाळा म्हणजे आदिवासी शाळा/आश्रमशाळा होय. क्रीडा क्षेत्रात आदिवासी शाळांमधील क्रीडापटू असतात. त्यांना कोणकोणत्या क्रीडा सुविधा असतात. किंवा नसतात. ते खेळाडू कशा प्रकारे सराव करतात. त्यांना मार्गदर्शन कोण करतात. कोणकोणते खेळ खेळतात यांचा अभ्यास करणे. आदिवासी भाग म्हटला कि आपल्या डोळयांसमोर येते कि असुविधा, जंगल, अतिदुर्गम भाग पण हे लोक खेळाडू कसे सराव करतात. क्रीडा क्षेत्रात कसे येतात. हे महत्वाचे असते. महाराष्ट्र शासन कोणकोणत्या योजना राबवते याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. दुर्गम व डोंगराळ भूप्रदेशाची समस्या विचारात घेतल्यावर तेथील सुविधांचा अंदाज येतो. आपण बघतो की शिक्षणाच्या क्षेत्रात उर्वरित लोकसंख्येच्या तुलनेने निःसंशयपणे आदिवासी लोक फारच मागे आहेत.

१) माझ्या सभोवताली शहरी ग्रामीण शाळांमधील असणाऱ्या क्रीडा सुविधा आदिवासी भागात असतील का जर असतील तर त्या किती प्रमाणात असतील ?

२) क्रीडा शिक्षण पायाभूत सुविधा व्यायामाची साधने, कमतरता या सुविधा वाढल्या नंतर काय फरक पडेल?

३) या मधून खेळाडूंचे प्राविण्य मिळविणे क्रीडा क्षेत्रात प्रगती शासकीय सामाजिक संस्था यांची प्रगती होईल. हा भाग प्रगत होण्यास मदत होईल.

- **समस्येचे स्पष्टीकरण**

आज आपण बघतो शहराकडील ग्रामीण / निमशहरी भागातल्या शाळांमध्ये क्रीडा सुविधा कशा असतात. काही शाळांमध्ये असतात तर काही शाळांमध्ये नाही. शहरी भागात असे असेल तर आदिवासी भागात क्रीडा सुविधा कशा असतील किती प्रमाणात असतील कोणकोणत्या असतील याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

- **समस्येचे महत्व व गरज**

अहमदनगर जिल्हयामधील आदिवासी आश्रम शाळां मधील क्रीडा सुविधा कशा आहेत हे या संशोधनामुळे समजेल सदर परिस्थितीमध्ये कोणत्या क्रीडा सुविधा उपलब्ध आहेत. हे समजेल. यासाठी ही समस्या निवडण्याची गरज आहे. क्रीडा सुविधांची गरज का आहे हे समजेल. क्रीडा सुविधांमध्ये बदल करणे त्यामध्ये वाढ करणे काय उपाययोजना करणे गरजेचे आहे ते समजेल. आदिवासी आश्रम शाळांमधील क्रीडा सुविधा वाढविण्यासाठी काय उपाय केले पाहिजे ते समजले.

अत्यल्प सोयी शहरी ग्रामीण भागाच्या तुलना करता दुर्लक्षित भाग. या भागात असणाऱ्या क्रीडा विषयक पायाभूत सोयी सुविधा, व्यायामाची साधने यांमध्ये काय फरक पडेल ?

अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी भागाचे महत्व वाढेल वर्तमान स्थिती काय आहे हे समजेल.

शासकीय सामाजिक प्रगती होईल.

अपेक्षित स्थिती कशी असावी हे समजेल.

आवश्यक साधनांचा शोध घेता येईल.

- **उद्दिष्टये :**

१) अहमदनगर जिल्हयामधील आदिवासी आश्रम शाळांमधील क्रीडा सुविधांचे माहिती संकलित करणे.

२) आदिवासी शाळांमधील क्रीडा सुविधांचा अभ्यास करण्यासाठी/ प्रश्नावली तयार करणे. ३) अहमदनगर जिल्हयामधील आदिवासी आश्रम शाळांमधील उपलब्ध सोयी सुविधांच्या आधारे सोयी सुविधांचे विशलेषण.

- **गृहितके:**

१) अहमदनगर जिल्हयामधील आदिवासी आश्रम शाळांमधील क्रीडा सुविधांचा अभ्यास करण्यासाठी शिक्षकांची व शाळांची / प्रशासनाची परवानगी असेल.

२) प्रस्तुत संशोधनसाठी संबंधित शाळा प्रशासन व तेथील क्रीडा विषयक शिक्षकांचा योग्य प्रतिसाद असेल.

(३) आदिवासी शाळांमध्ये क्रीडा सुविधा योग्य प्रमाणामध्ये उपलब्ध असतील.

- **मर्यादा :**

१) माहिती उपलब्ध करून देणाऱ्या शिक्षक प्रशासकीय अधिकारी यांची मानसिकता, वातावरण यांच्या विचारांवर भावनांवर होणारा परिणाम संशोधकांच्या नियंत्रनामध्ये नाही.

२) आदिवासी शाळांमधील शिक्षक/प्रशासकीय अधिकारी यांच्या प्रतिसादावर प्रस्तुत संशोधन अवलंबून राहील.

३) आदिवासी शाळांमधील क्रीडा सुविधांचा अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण , चित्रफीत इ. मधून येणाऱ्या प्राप्तांकावर प्रस्तुत संशोधन अवलंबून राहील.

परिसिमा :-

१) प्रस्तुत संशोधन अ.नगर जिल्हयातील आदीवासी शाळांपुरतेच मर्यादीत असेल.

२) प्रस्तुत संशोधन हे अहमदनगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, राहुरी, कोपरगाव, पारनेर, या तालुक्यातील सर्व आदिवासी शाळांपुरतेच मर्यादित असेल.

कार्यात्मक व्याख्या :

आदिवासी :- डोंगराळ व दुर्गम भागात राहणारे लोक

आश्रम शाळा :- डोंगराळ व दुर्गम भागात असणाऱ्या शाळा म्हणजे आश्रम शाळा होय.

क्रीडा सुविधा:- खेळासाठी सरावासाठी असणाऱ्या सुविधा उदा. क्रिडांगण, क्रीडा साहित्य, क्रीडा शिक्षक इत्यादी.

संदर्भ साहित्याचा आढावा

पी. ए. तिकोने (२०१७), यांनी महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील आश्रम शाळेतील सर्वेक्षण केले लेखकांच्या मते प्रचंड खर्च करून सुद्धा आदिवासीच्या शैक्षणिक विकास म्हणावा तसा झाला नाही. या अभ्यासाद्वारे लेखकाने आदिवासीच्या शैक्षणिक विकास संबंधित गेल्या दोन शतकातील सांख्यिकीय आकडेवारी देखील दिली आहे. लेखकाच्या मते स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या शैक्षणिक गुणात्मक वाढीकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. त्यामुळे नाशिक भागातील आदिवासी समाज आजही शैक्षणिक दृष्टया मागासलेला आहे.

राष्ट्रीय अनुसूचित जमाती अयोग्य (२००९) यांच्या वाढीने महाराष्ट्रातील काही आश्रम शाळेतील आदिवासींच्या शिक्षणाची व्यवस्था कशी आहे या बाबत सर्वेक्षण अभ्यास होता. या अभ्यासाद्वारे शिक्षणाचा दर्जा, उपलब्ध शैक्षणिक सोयी सुविधा, शैक्षणिक साहित्य याबाबत परीक्षण केले. या सर्वे द्वारे असे लक्षात आले कि बहुतांशी आश्रम शाळेच्या इमारतींचे बांधकाम दर्जेदार नाही तसेच इतर सोयी सुविधांचे अभाव जाणवला. येथील शैक्षणिक दर्जा देखील फारसा समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले.

एल. जी. कड्गाळे (२००८) यांनी शासकीय आश्रम शाळेमध्ये विध्यार्थ्यांना जाणवणाऱ्या समस्या व अडचणींवर प्रकाश टाकला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांचे नापासांचे प्रमाण, गळतीचे प्रमाण, पालकांची उदासीनता आणि त्याचा नकारात्मक दृष्टीकोन आणि आश्रम शाळेतील सोयी सुविधा या बाबत टीकात्मक चर्चा केली आहे.

उ.प्र. थोरात (१९९३) यांनी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील निग'डोल या आदीवासी भागातील शासकीय आश्रम शाळेचे परीक्षण केले. लेखिकेच्या मते या शाळेतील सर्व सुविधा पुरेश्या प्रमाणात पुरवल्या जात आहेत. या शाळेतील बहुतांश विद्यार्थी कला, क्रीडा, शिक्षण इ. क्षेत्रांत निपुण असेलेली आढळून अली. या शाळेतील आदिवासी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शिक्षक विशेष कष्ट घेत असल्याचे लेकिकेला दिसून आले.

इंदर शहा . मडावी (२००२) यांनी आश्रम शाळा योजनेविषयी माहिती दिले आहे. लेखकाने असे नमूद केले आहे कि आश्रम शाळा योजनेमुळे आदिवासी विभागातील मुलांच्या शैक्षणिक विकासाला गती मिळाली आहे. लेखकाच्या मते आदिवासीच्या कासाच्या कार्यक्रमामध्ये लोकांचा सक्रिय सहभाग हवा. आणि असे झाले तरच आदिवासीच्या शैक्षणिक विकास कार्यक्रम यशस्वी होऊ शकेल.

संशोधन पद्धती

संशोधन पद्धत- संशोधन हे एक वैज्ञानिक प्रक्रिया आहे. संशोधनाची पद्धत ही परिणामान - मधील अचूकता आणि संशोधन निष्कर्षांच्या गुणवत्तेचा निर्णय घेते. म्हणून संशोधन तज्ञांनी संशोधन पद्धतीला नियंत्रण यंत्रणा मंडळी आहे. सदर संशोधन हे अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी शाळांमध्ये उपलब्ध सोयी सुविधांचा अभ्यास व आढावा घेऊन त्यावर उपाय योजना, माहिती मिळवणे म्हणून सदरचा अभ्यास वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धत आहे.

जनसंख्या - सादर संशोधनासाठी अहमदनगर जिह्यातील सर्व आदिवासी शाळा ही जनसंख्या असेल.

न्यादर्श तंत्र- न्यादर्शन संशोधातील महत्वाचा भाग आहे. संशोधन माहिती संकलनासाठी आवश्यक उपलब्ध जनसंख्येतून योग्य न्यादर्शनाची गरजेचे असते, न्यादर्शनी दिलेल्या माहितीवर संशोधनाचे निष्कर्ष अवलंबून असतात. सदर संशोधनासाठी संशोधक सहेतुक न्यादर्श निवड पद्धतीने न्यादर्शनची निवड करणे. अहमदनगर जिल्यातील अकोले, संगमनेर, राहुरी, पारनेर या तालुक्यातील सर्व आदिवासी शाळा.

न्यादर्श- अहमदनगर जिल्पातील अकोले, संगमनेर, राहुरी, पारनेर या तालुक्यातील सर्व आदिवासी शाळा.

माहिती संकलनाची साधने - प्रश्नावली, मतावली मुलाखत निरीक्षण पद्धत, व्हिडीओ,चीत्रीकरणाद्वारे माहिती संकलन करण्यात येईल.

जनसंख्या:- अंदाजे १५ ते २० शाळा एवढे असेल.

संदर्भ साहित्य

१) जर्दे, श्री. आ. (१९९५). शारीरिक शिक्षण तत्वे व स्वरूप कोल्हापूर चंद्रमा प्रकाशन पृष्ठ क्रं.

२) आलेगावकर, प.म. (२०१०). नवे क्रीडा संदर्भ शास्त्र. पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन पृष्ठ क्रं. ५२

३) आगलावे प्रदीप, (२००४). आदिवासी समाजाचे समाजशास्त्र श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,

४) गोरे गोविंद, (१९९७), आदिवासी शिक्षण, साकेत प्रकाशन औरंगाबाद महाराष्ट्र

५) गोरे गोविंद, (१९९८). आदिवासी विकास योजना, पुणे आदिवासी विकास प्रतिष्ठान

६) महाराष्ट्र शाशन आश्रम शाळा संहिता आदिवासी विभाग.

७) पानसे रमेश, (२००८). स्वयंसेवी संस्था आणि आदिवासी विकास अर्थसंवाद खंड ५ अंक ४

८) कुलकर्णी रेणुका, (२००७) आदिवासी शाळे संबंधी शाकीय धोरणे एक चिकित्सक अभ्यास, शिक्षण आणि समाज अंक ३३ भारतीय शिक्षण संस्था पुणे

९) तिकोने.पी.आर (२००५) महाराष्ट्र राज्यातील आणि जमातींची शैक्षणिक सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची पाहणी. आदिवासी संशोधन पत्रिका आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

१०) पानसे. व्ही.जी (२००१) आदिवासी विकासात आश्रम शाळेचे योगदान; चिकित्सक अभ्यास आदिवासी संशोधन पत्रिका आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

११) "व्ही. बी. सत्य सावित्री आणि होकारेरी पी.म. (२०१८) आश्रम शाळा समस्या आणि आव्हानांचा प्रभाव.

१२) Bhagvat M.K (2010) Ashrams school run by NGO's economic and political weekly.

संशोधक **मार्गदर्शक**

प्रवीण दौलतराव गुंजाळ **डॉ. कैलास पाळणे**